# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

### ओशिवरा प्रसुतीगृह, जोगेश्वरी (प.)

**जाहिरात क्र. एचओ/938/ओएमएचजे दि.21.01.2026**

**विषयः-** के/पश्चिम विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत ओशिवरा महानगरपालिका प्रसुतिगृह येथे बधिरिकरणतज्ञांची पॅनलवर निवड करण्याबाबत...

के/पश्चिम विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत ओशिवरा महानगरपालिका प्रसुतिगृह, जोगेश्वरी (पश्चिम) येथील आंतररूग्णांच्या शस्त्रक्रीयेकरिता बधिरिकरणतज्ञ यांची पॅनलवर निवड करण्याकरिता इच्छूक **बधिरिकरणतज्ञ** यांची परिपत्रक क्र. एचओ / १९८१६ / आस्था.-२ दि. १३.१२.२०२५ अन्वये खाली नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता तसेच अटी व शर्तीनुसार दि. 22.01.2026 गुरुवार ते दि. 02.02.2026 सोमवार पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**<u>बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता</u>**

1. उमेदवार संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी / पदविका / डीएनबी धारण करणारा असावा.
2. पदव्युत्तर पदवी प्राप्त झाल्यानंतर १ वर्षाचा अनुभव धारण करणारा असावा.
3. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र तसेच नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.
4. अतिरिक्त अर्हतेचे महाराष्ट्र मॅडिकल कौन्सिलशी नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र / नुतणीकरण आवश्यक.

**<u>बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती</u>**

1. बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील डॉक्टरांची **वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत राहिल.**
2. प्रत्येक प्रसूतिगृहात बधिरिकणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनेलमध्ये कमीत कमी दोन तज्ञ असावेत.
3. बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांना चक्रांकीत पध्दतीने शस्त्रक्रिये करिता बोलाविण्यात यावे.
4. **बधिरिकरणतज्ञ / बालरोगतज्ञ / सोनोलॉजिस्ट पॅनलवरील तज्ञांचे राहण्याचे ठिकाण हे प्रसूतिगृह / रूग्णालयापासून शक्यतो जवळ असावे.**

5 बधिरिकरणतज्ञ नियमित शस्त्रक्रियेबरोबर तातडीच्या शस्त्रक्रियेकरीता सुध्दा उपलब्ध असावेत.

6 एकुण 3 बधिरीकरणतज्ञांची निवड पॅनलवर केली जाईल व अतिरिक्त 1 बधिरीकरणतज्ञ यांची निवड प्रातिक्षायादी करिता केली जाईल.

7 पॅनलवर बधिरिकरण तज्ञांची निवड करण्याचे अंतिम निर्णय हे मान. कार्यकारी आरोग्य अधिकारी, सार्वजनिक आरोग्य खाते यांचे राहील.

**बधिरिकरण पॅनलवरील डॉक्टरांना देण्यात येणा-या सुधारित दराचा तपशिल**

**बधिरिकरण पॅनल मानधनाचा तक्ता**

| अ. क्र. | सुविधेचे नाव | शस्त्रक्रियेचा प्रकार | प्रस्तावित मानधन | नियोजित वेळेपेक्षा जास्त झालेल्या वेळेसाठी जास्त मानधन |
|---|---|---|---|---|
| अ. | बधिरिकरण सेवा | **नित्य स्वरूपाच्या** | | |
| | | लहान शस्त्रक्रिया | रू. १८५०/- पहिल्या तासाकरिता | रू. ३००/- प्रति तास |
| | | मोठया शस्त्रक्रिया | रू.४५००/-पहिल्या तीन तासाकरिता | रू. ७००/- प्रति तास |
| ब. | | **तात्काळ स्वरूपाच्या** | | |
| | | लहान शस्त्रक्रिया | रू.३५००/- पहिल्या तासाकरिता | रू. ५५०/- प्रति तास |
| | | मोठया शस्त्रक्रिया | रू.६०००/- पहिल्या तीन तासाकरिता | रू. १४००/- प्रति तास |

उपरोक्त नमूद अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छूक **बधिरिकरणतज्ञ** यांनी वैद्यकीय अधिकारी (प्रभारी), ओशिवरा प्रसुतीगृह, जोगेश्वरी (पश्चिम) यांच्या नावे स्वहस्ताक्षरात आपले अर्ज व सहकागदपत्रे ओशिवरा प्रसुतीगृह स्थित गोरेगाव महानगरपालिका प्रसुतिगृह, गोरेगाव (पश्चिम) कार्यालयात दि. 22.01.2026 गुरुवार ते दि. 02.02.2026 सोमवार पर्यंत (साप्ताहिक सुट्टी व सार्वजनक सुट्टी वगळून) सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी १८.०० वा. पर्यंत पोचतील याची दक्षता घ्यावी.

सही/- 21.01.2026
वैद्यकीय अधिकारी (प्रभारी)
ओशिवरा महानगरपालिका प्रसुतिगृह,
जोगेश्वरी (पश्चिम)